**नियमित दिवाणी कज्ञा क्र.१३७/२०२१ मधील नि.क्र. ३० वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०३/०२/२०२४)

सौ. सुनिता शिवाजी ढोणुक्षे वगैरे ०२ वि. श्री. शिवाजी ईश्वरा ढोणुक्षे, वगैरे ०५.

**CNR -MHKO130007082021**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला 'कैफियत नाही' हा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रस्तुत दावेचे समन्स प्रतिवादी क्र. ७ यांना लागू झालेनंतर प्रतिवादी क्र. ७ थंडी-तापाने आजारी पडल्याव त्यांना नियमितपणे औषधोपचार घ्यावा लागला होता, त्या कारणास्तव प्रतिवादी क्र. ७ यांना वकीलांची भेट घेवून कैफियत तयार करणेकरीता प्रस्तुत दावेसंदर्भात आवश्यक ती माहिती देता आली नाही. दरम्यानचे काळात प्रस्तुत प्रतिवादी क्र. ७ विरुध्द 'विना कैफियत' आदेश झालेला आहे. अशा परिस्थितीत दावेचे काम चाललेस व निकाली झालेस प्रतिवादी क्र. ७ यांच्या हक्कावर गदा येणार आहे. जाणुनबुजुन प्रतिवादी क्र. ७ यांनी कैफियत देणेस विलंब केलेला नाही. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीशी निगडीत असल्याने प्रतिवादी क्र. ७ यांची कैफियत स्विकारुन दावा गुणदोषावर निर्णित होणे गरजेचे आहे. अन्यतः, प्रतिवादी क्र. ७ यांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, वरील सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र. ७ विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदर अर्जाच्या मागील बाजूस वादीतर्फे त्यांचे म्हणणे दाखल केले असून, प्रतिवादी यांनी जाणुनबुजुन खोटया मजकुराचा अर्ज दिलेला आहे. अर्जातील संपूर्ण कथने चुकीची व लबाडीची आहेत. कोणतीही संयुक्तीक कारणे अर्जात नमुद नाहीत. सबब, अर्जदारांचा अर्ज नामंजूर करणेत यावा अगर मंजूर केला तर रक्कम रु. ५००/- इतकी रक्कम खर्च स्वरुपात वादीस मिळावी असे वादीने कथन केले आहे.

४. उभय बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश पारित झालेला आहे असे दिसून येते. प्रतिवादीनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली कथने ही शपथेवरती असल्याने ती ग्राहय धरावी लागतील. कैफियतीच्या स्वरुपात म्हणणे मांडण्याची संधी प्रतिवादी यांना देणे हे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

तसे न झाल्यास निश्चितपणे नैसर्गिक न्याय तत्त्वाचे उल्लंघन होईल. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादींमुळे जो काही विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादींवरती बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. ३०) प्रतिवादी क्र. ७ यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. ७ यांचेविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरी/-.
**(अमोल भारत जवळे)**
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.

कागल.
दिनांक – ०३/०२/२०२४